16 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक चिकित्सालयाची समाजाला आवश्यकता : डॉ. शिर्के

## कुलगुरू डॉ. शिर्के; समाजशास्त्र विभागात चिकित्सालयाचे उद्घाटन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात सामाजिक चिकित्सालयाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी डॉ. प्रल्हाद माने, डॉ. जगन कराडे, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन आदी.

कोल्हापूर, ता. १५ : ''समाजशास्त्र विभागाने सामाजिक चिकित्सालयाची वेगळी संकल्पना समाजासमोर आणली आहे, ज्याची समाजाला नितांत आवश्यकता आहे,'' असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते सामाजिक चिकित्सालयाचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''समाजशास्त्र विभागातर्फे समाज विकासात भर घालण्यासाठी आणि विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, योगाया चार स्तरांवर समाजातील व्यक्तींच्या शारीरिक व्याधी कमी करण्यासाठी कार्यरत आहेत. असे असले तरी विविध व्यक्तीगत आणि कौटुंबिक प्रश्नांमुळे अनेक मानवनिर्मित व्याधी निर्माण होतात. सामाजिक नाते संबंध अतिशय संवेदनशील असतात. त्यातील गुंता हळूवारपणे सोडवण्यासाठी हे चिकित्सालय उपयुक्त ठरेल.' प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी सामाजिक चिकित्सालयाची संकल्पना आणि त्याची आवश्यकता विषद केली. डॉ. पी. एम. माने यांनी आभार मानले. डॉ. एस. एस. महाजन, डॉ. व्ही. एस. मारुलकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ पी. बी. देसाई, डॉ. संजय कांबळे, कोमल ओसवाल, अभिजित पाटील आदी उपस्थित होते.

16 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे 'नॅक' पुनर्मूल्यांकन

## समितीने १६ अधिविभागांना प्रत्यक्ष भेट देऊन केली पाहणी



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या चौथ्या 'नॅक' पुनर्मूल्यांकनास सोमवारी सकाळी सुरुवात झाली. दिवसभरात समितीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह विविध घटकांशी संवाद साधला. सुमारे १६ अधिविभागांना प्रत्यक्ष भेट देऊन समितीने पाहणी केली.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅक पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी प्रा. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समितीचे सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणात आगमन झाले. समितीमध्ये प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच. मोईनुद्दीन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार, प्रा. हरिश चंद्रा दास यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्यापीठ अधिकाऱ्यांनी समिती सदस्यांचे विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यासमोर स्वागत केले.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर समितीने विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, विविध विभागप्रमुख, शिक्षक व संशोधक यांच्यासमवेत चर्चा केली. त्यानंतर दुपारच्या सत्रात परीक्षा व मूल्यमापन मंडळ, आयसीटी कक्ष यांच्यासह निवडक विभागप्रमुखांशी चर्चा केली. सीएफसी, लीड बॉटनिकल गार्डन यांचीही समितीने पाहणी केली. सायंकाळच्या सत्रात विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समितीसमोर विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

16 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅक समितीचा संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद

## नॅक मूल्यांकन सुरू; विविध १६ अधिविभागांचा घेतला आढावा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात आज नॅक मूल्यांकनाला प्रारंभ झाला. या अंतर्गत नॅक समितीच्या सदस्यांनी विद्यापीठातील १५ अधिविभागांना भेटी दिल्या. तसेच संशोधक विद्यार्थी, अभ्यास मंडळे, विभाग प्रमुख यांच्याशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, अधिविभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन या बाबतची माहिती घेतली.



शिवाजी विद्यापीठाच्या आवारात सकाळी साडेआठ वाजता सहा जणांच्या नॅक समिती सदस्यांचे आगमन झाले. सर्वप्रथम त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या सुरक्षारक्षकांनी समिती सदस्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला. ९.१५ मिनिटांनी प्रत्यक्ष मूल्यमापनाला सुरुवात झाली. पहिल्यांदा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी समिती सदस्यांसमोर विद्यापीठाच्या वाटचालीचे सादरीकरण केले. सिनेट हॉलमध्ये सादरीकरण केले. यावेळी सर्व अधिविभागांचे प्रमुख व उपकुलसचिव उपस्थित होते. यानंतर समिती सदस्यांनी दोन-दोन व्यक्तींच्या तीन टीम केल्या व १६ अधिविभागांना भेटी दिल्या.

**या विभागांना दिल्या भेटी**

रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, बायोकेमेस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, हिंदी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, वाणिज्य यासह अन्य काही विभागांना भेटी दिल्या.

अधिविभागांमध्ये विभागप्रमुखांनी समिती सदस्यांसमोर विभागाच्या कामाचे सादरीकरण केले.

यामध्ये त्यांनी विभागातील विद्यार्थ्यांची संख्या, माजी विद्यार्थ्यांची संख्या, प्राध्यापकांचे मार्गदर्शन, विविध संशोधन, सामाजिक उपक्रम यांची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी इनक्युबेशन सेंटर, प्रयोगशाळा यांना भेटी दिल्या. दुपारी जेवणानंतर त्यांनी विविध विभागांच्या अभ्यास मंडळाच्या सदस्यांशी संवाद साधला. अभ्यासक्रम तयार करताना कोणत्या गोष्टींना प्राधान्य देता, अभ्यासक्रम बनवताना स्थानिक उद्योजक यांच्याशी चर्चा होते का, जेंडरविषयक माहिती घेऊन त्या दृष्टीने अभ्यासक्रमाचा विचार होतो का? हे प्रश्न त्यांनी विचारले. संध्याकाळी त्यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचे संशोधन, देण्यात येणाऱ्या सुविधांविषयी सदस्यांनी प्रश्न विचारले. भाषा भवन येथे सांस्कृतिक कार्यक्रम झाला. संगीत व नाट्यशास्त्र विभाग आणि विद्यार्थी गुणवत्ता कक्ष यांनी नृत्याविष्कार सादर केला.

तरुण भारत

# ‘नियतकालिकांमधून लेखक, कवी घडतात’

प्रतिनिधी
कोल्हापूर

नियतकालिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळतो. यातून विविध विषयावर आपल्या संकल्पेतून प्रकाश टाकणारे कविता, लेख विद्यार्थी लिहित असतात. यातूनच अनेक लेखक, कवी घडतात, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये ऑनलाईन पध्दतीने आयोजित कराड येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सच्या ‘यशवंत’ आणि वेणूताई चव्हाण कॉलेजच्या ‘संगम’ या नियतकालिकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के पुढे म्हणाले, ‘यशवंत’ या नियतकालीकेचे संपादन डॉ. ए. व्ही. माळी यांनी तर ‘संगम’ या नियतकालीकेचे संपादन डॉ. महेंद्र कदम-पाटील यांनी केले.

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडचे प्राचार्य डॉ.एल. जी. जाधव यांनी प्रास्ताविक केले. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराडचे प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार यांनी आभार मानले, प्रकाश पाटील, माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बी. एन. गोफणे, कराड येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि वेणूताई चव्हाण कॉलेजचे प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
16 MAR 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या नॅक मूल्यांकनास प्रारंभ

## अधिकाऱ्यांबरोबर संवाद, विद्यापीठाच्या अहवालाचे सादरीकरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या चौथ्या 'नॅक' पुनर्मूल्यांकनास सोमवार सकाळपासून प्रारंभ झाला. दिवसभरात समितीने कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह विविध घटकांशी संवाद साधला. सुमारे १६ अधिविभागांना प्रत्यक्ष भेट देऊन समितीने पाहणी केली. यावेळी अधिविभागातील विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

विद्यापीठाच्या नॅक पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी प्रा. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समितीचे सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणात आगमन झाले. समितीमध्ये प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच.



मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार, प्रा. हरिश चंद्रा दास यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्यापीठ अधिकाऱ्यांनी समिती सदस्यांचे स्वागत केले. शिवपुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केल्यानंतर समिती सदस्यांनी ठीक नऊ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. समितीने थेट पुनर्मूल्यांकनाच्या कामकाजास सुरुवात केली.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सविस्तर सादरीकरणाने मूल्यांकनास सुरुवात झाली. त्यानंतर समितीने विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, विविध विभाग प्रमुख, शिक्षक व संशोधक यांच्यासमवेत चर्चा केली. त्यानंतर दुपारच्या सत्रात परीक्षा व मूल्यमापन मंडळ, आयसीटी कक्ष यांच्यासह निवडक विभाग प्रमुखांशी चर्चा केली. सीएफसी, लीड बॉटनिकल गार्डन यांचीही समितीने पाहणी केली. सायंकाळच्या सत्रात विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समितीसमोर विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

लोकमत

# 'कर्मवीर डी. आर. भोसले' चरित्र ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्राचार्य डॉ. विलास पोवार लिखित 'कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र व कार्य' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी (दि. १८) सायंकाळी साडेपाच वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होईल.



अध्यक्षस्थानी 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, तर इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. डी. बी. खणे, विद्यापीठातील इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. अरुण भोसले प्रमुख उपस्थित असतील. कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. नाशिक येथे फौजदार म्हणून रुजू झाल्यानंतर तेथे त्यांनी सत्यशोधक समाज, मराठा विद्याप्रसारक समाज स्थापन करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. कोल्हापुरात शिक्षणाधिकारी पदावर काम करताना त्यांनी कोल्हापूर गव्हर्न्मेंट सर्व्हंट को-ऑपरेटिव्ह बँक, प्राथमिक शिक्षक बँक, मराठा बँक, कोल्हापूर न्यूजपेपर असोसिएशन, मराठा महिला वसतिगृह, कोल्हापूर कन्झ्युमर्स स्टोअर्स, कोल्हापूर जिल्हा शेतकरी सहकारी संघ, आदी संस्थांच्या स्थापनेत मोलाचे सहकार्य केले.

छत्रपती शाहूंच्या निधनानंतर त्यांच्या पुरोगामी विचारांची ज्योत तेवत ठेवणाऱ्या मोजक्या व्यक्तींमध्ये डी. आर. भोसले यांचे कार्य मोलाचे असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पोवार यांनी दिली. या पुस्तकामुळे त्यांचे कार्य नव्या पिढीली समजणार मदत होणार आहे.

सकाळ

# नैतिकतेचा अंगीकार करून यशस्वी व्हा : डॉ. शिंदे

नानीबाई चिखली, ता. १५ : आव्हाने पाहिल्यानंतर तरारून उठतो तो तरुण; मग तो कोणत्याही वयोगटातील असो. याच तरुणांनी यशस्वी व्यक्तींचा प्रवास समजून घ्यावा, त्यानंतर आपले ध्येय ठरवताना मोहाचे क्षण टाळावेत. अशावेळी नैतिकतेचा अंगीकार केल्यास जीवनात नक्कीच यशस्वी होता येत असल्याचा कानमंत्र शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिला.

अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेजमध्ये पद्मभूषण देवचंदजी शाह स्मृती व्याख्यानमालेत 'तरुणांसमोरील आव्हाने' विषयावर ते बोलत होते. प्रकाश शाह अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर, माजी प्राचार्या कमला हर्डीकर, कांचन पाटील उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासताना त्यांच्यातील माणूस अभ्यासला पाहिजे. अभ्यासलेला माणूस जगताना तो वाटायलाही हवा."



डॉ.व्ही.एन.शिंदे बोलताना.

प्राचार्य डॉ. हेरेकर यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र हजारे, रमजान कराडे, सोमनाथ खोत, मधुकर पाटील, दत्तात्रय पाटील, सदाशिव आंबोसे, विष्णुपंत इंगवले, अवधूत गडकरी आदी पत्रकारांचा सत्कार झाला. यावेळी वृत्तपत्र कात्रण संग्रहाचे प्रकाशन झाले. शेषगिरी कागवाडे, सुहास निव्हेकर, सुजाता पाटील, आनंद संकपाळ आदी उपस्थित होते. सुजाता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, सुषमा जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
1 6 MAR 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'नॅक' पुनर्मूल्यांकनास प्रारंभ

## समितीकडून १६ अधिविभागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या चौथ्या 'नॅक' पुनर्मूल्यांकनास सोमवार सकाळपासून प्रारंभ झाला. दिवसभरात समितीने कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासह विविध घटकांशी संवाद साधला. समितीने १६ अधिविभागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

विद्यापीठाच्या नॅक पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी प्रा. जे.पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समितीचे सोमवारी सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणात आगमन झाले. समितीमध्ये प्रा. बी.आर. कौशल, प्रा. एस.ए.एच. मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार, प्रा. हरिश चंद्रा दास यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्यापीठ अधिकाऱ्यांनी समिती सदस्यांचे विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यासमोर स्वागत केले. शिवपुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केल्यानंतर समिती सदस्यांनी नऊ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. औपचारिक बाबी बाजूला सारुन समितीने थेट पुनर्मूल्यांकनाच्या कामकाजास सुरवात केली.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सादरीकरणाने मूल्यांकनास सुरुवात झाली. त्यानंतर समितीने विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, विविध विभाग प्रमुख, शिक्षक व संशोधक यांच्यासमवेत चर्चा केली. दुपारच्या सत्रात परीक्षा व मूल्यमापन मंडळ, आयसीटी कक्ष यांच्यासह निवडक विभाग प्रमुखांशी चर्चा केली.

16 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन सुरू

## १६ अधिविभागांची पाहणी : अधिष्ठाता, संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचे २०२१-२०२६ या कालावधीसाठी राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्यावतीने (नॅक) पुनर्मूल्यांकन सोमवारपासून सुरू झाले. मूल्यांकनाची चौथी फेरी आहे. मूल्यांकन समितीने पहिल्या दिवशी विद्यापीठातील विविध १६ अधिविभागांची पाहणी केली. त्यासह कुलगुरू, अधिष्ठाता, अभ्यासमंडळांचे अध्यक्ष आणि संशोधक विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला.

या मूल्यांकनाच्या प्रक्रियेसाठी प्रा. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती सोमवारी सकाळी नऊ वाजता विद्यापीठात दाखल झाली. प्रा. शर्मा यांच्यासह प्रा. बी. आर. कौशल, एस. ए. एच. मोईनुद्दिन, तरुण अरोरा, सुनील कुमार, हरिश चंद्रा दास यांचे स्वागत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून समितीच्या सदस्यांनी अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वाटचालीविषयीचे सादरीकरण केले.

समितीने विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिविभागप्रमुख, प्राध्यापक, संशोधक यांच्यासमवेत चर्चा केली. त्यानंतर समिती सदस्यांनी आपल्यातील प्रत्येकी दोन सदस्यांचे तीन गट करून अधिविभागांची पाहणी सुरू केली.

रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, बायोकेमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स, नॅनो टेक्नॉलॉजी, मराठी, संगीत व नाट्यशास्त्र, लॉ, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागांची पाहणी केली.

दुपारच्या सत्रात परीक्षा व मूल्यमापन मंडळ, आयसीटी कक्ष यांच्यासह निवडक विभाग प्रमुखांशी चर्चा केली. सीएफसी, लीड बॉटेनिकल गार्डनची पाहणी केली. विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समितीसमोर सायंकाळी वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये विशेष सांस्कृतिक कार्यक्रम रंगला. आज आणखी काही विभागाची पाहणी होणार आहे.

### माजी विद्यार्थ्यांशी आज संवाद



समिती आज, मंगळवारी सकाळच्या सत्रात संगणक केंद्र, ग्रंथालय आदींना भेट देणार आहे. दुपारी तीन ते चार यावेळेत माजी विद्यार्थी, पालक यांच्याशी, तर सायंकाळी विविध अधिकार मंडळांतील सदस्यांशी संवाद साधणार आहे.

### अभ्यासक्रमातील बदल विचारणा

या समिती सदस्यांनी अभ्यासक्रम कसा बदलता, त्यासाठी कोणते निकष वापरता, आदींची माहिती अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांकडून घेतली. अधिविभागामध्ये समितीसमोर तेथील प्रमुखांनी सादरीकरण केल्यानंतर गेल्या पाच वर्षांतील विभागातील संशोधन, वेगळी कामगिरी, मिळालेले पुरस्कार, पीएच.डी. आणि एम. फिल झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, आदींबाबत समिती सदस्यांकडून विचारणा केली जात होती. त्याबाबतच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत होती.